## एतदर्थ मंडळ (मराठी प्रशिक्षण व परीक्षा), महाराष्ट्र शासन

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,
डॉ. आंबेडकर उद्यानाजवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.

**राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी मराठी भाषा उच्चस्तर परीक्षा**

वार, दिनांक
(वेळ - सकाळी १०.३० ते दुपारी १.१५)
[तोंडी परीक्षेस लागणार वेळ धरून]
(एकूण गुण - १००)

**प्रश्नपत्रिका एक--विहित पाठ्यपुस्तक व कार्यरूप व्याकरण**

सूचना:- प्रत्येक प्रश्नाचे गुण त्या त्या प्रश्नासमोर नमूद केले आहेत.

**गुण**

**प्र. १** खालीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची उत्तरे **पाच** ते **सहा** ओळीत लिहा :- **२५**

(१) नवीन गावी आला तेव्हा अमीरपुढे कोणता प्रश्न होता ?
(२) अमीरचे कुटुंब कोठून व कसे आले होते ?
(३) अमीरच्या वडिलांच्या कपाटात काय होते ?
(४) सरपंचाने अमीरला काय सांगितले ?
(५) ग्यानबा पाटलाचे लेखकाने कसे वर्णन केले आहे ?
(६) अमीर ढसाढसा का रडत होता ?
(७) ग्यानबाची स्थिती पाहून अमीरने काय केले ?
(८) अमीर मनाचाही अमीर होता तो कसा ?
(९) जूलियाचे वर्णन पाठाच्या सुरूवातीला कसे केले आहे ?
(१०) क्षितीन्द्र जूलियाच्या घरी गेला त्या भेटीचे वर्णन करा.
(११) "जूलियाचे अश्रू स्वत:च्या हाताने पुसण्यापेक्षा त्याला ते टेबलावरील टिपकागदानेच पुसावे लागत " ह्या वाक्याचे स्पष्टीकरण करा.
(१२) लेखक अजूनही जूलीची आठवण काढतो का ? व कशी ?
(१३) सकाळी जाग आल्यावर आपले डोके कोणकोणत्या दिशांना आहे असे लंपनच्या मनात आले ?
१४) सुमीच्या आजोबांचं दिशांचं कसं वेड आहे असे लेखक म्हणतो ?
(१५) आजीच्या वाढदिवशी आजोबा आजीच्या मध्येमध्ये का करत होते ? शेवटी आजीने त्यांना कसे हटकले ?
(१६) आजोबांनी लंपनला कोणते काम सांगितले ?
(१७) आजांबांचे काम केल्यावर आजीची प्रतिक्रिया काय होती ?
(१८) आपल्यापेक्षा मोठ्या माणसाला नमस्कार करावयाचा असल्यास इंग्रजीत त्याला .काय म्हणतात? क्षितीन्द्रला हे कसे कळले ?
(१९) क्षितीन्द्रशी जूलिया कसा संवाद साधू शकली ?
(२०) "सिस्टर" या शब्दाचा अर्थ जूलीने काय सांगितला ? का ?

(२१) क्षितीन्द्रची ताई आता कुठे आहे ? ती त्याच्याशी संवाद साधते का ?
(२२) जूलीने दिलेली काच कशी जादू करायची ?
(२३) जूलियाची आठवण एकटेपणाशी कशी जोडली गेली आहे ?
(२४) जूलिया व क्षितीन्द्र यांची ताटातूट कशी झाली ?
(२५) लंपनच्या वर्गातील मास्तर दिशांवर कसे प्रश्न विचारतात ?
(२६) लंपनने सकाळचा जादा वेळ कसा घालवला ?
(२७) सुमीचे आजोबा पिशवीचा पत्ता कसा सांगतात ?
(२८) लंपनने लोण्याची आशा का सोडून दिली ?
(२९) लंपनला घरात त्या दिवशी वेगळे का वाटत होते ?
(३०) लपंनचा पतंग तयार झाला की नाही ? का ?
(३१) आज आजीचा वाढदिवस आहे हे कळल्यावर लंपनला काय वाटले ?
(३२) दामू आणि दिनू अभ्यास करताना एकमेकांशी का भांडत होते ?
(३३) दामूचे रीडर कोणी व का नेले ?
(३४) रीडरवरून दामू आणि दिनू यांच्यामध्ये झालेल्या भांडणाचे वर्णन करा.
(३५) दामू दिनूकडून शिटी मिळवण्यासाठी कोणती युक्ती योजतो ?
(३६) कुत्र्यांची भांडाभांडी बघताना कोणता घोटाळा होतो ?
(३७) मेघकुळे कशी वसली ?
(३८) देवाने उत्पन्न केलेली मूर्ती कशी होती ?
(३९) मराठीचा पाळणा कसा सजविला ?
(४०) मराठीची कहाणी ऐकल्याने काय होते ?
(४१) जगू रीडर का उचलतो ?
(४२) दिनू कशाचा अभ्यास करीत असतो ?
(४३) दिनू दामूला शिटी का दाखवित नाही ?
(४४) जग्या का रडतो ?
(४५) "तुला नाही मला नाही, घाल कुत्र्याला!" असे दिनू का म्हणतो ?
(४६) लोक का घाबरले ?
(४७) मेघांची कुळे होताना वीज काय करीत होती ?
(४८) वीजबाईने देवाकडे काय मागितले ?
(४९) मराठीचा पाळणा कोणी म्हटला ?
(५०) पाळण्याची दोरी कशी बनवली होती ?
(५१) लहानपणी कवीकडे कोणती खेळणी होती ?
(५२) थोडे मोठे झाल्यावर कवीच्या हाती काय आले ?
(५३) नव्यानव्याची हौस कशामुळे वाढली ?
(५४) कवीचे मन कोठे गुंतून पडले आहे ?
(५५) ज्योत्स्ना कदम यांच्या वडिलांना नवीन घर का बांधावेसे वाटले ?
(५६) बदलापूरच्या घरी प्रथमच राहावयास गेल्यानंतरची तेथील परिस्थिती कशी होती ?
(५७) ज्योत्स्ना कदम यांची डोंकयावरून कळशी भरून आणताना पंचाईत का होत असे ?
(५८) बदलापूरच्या घराभोवतालचे जागेचे वर्णन थोडक्यात करा.
(५९) घराभोवतालच्या जागेत कोणती झाडें व फुलझाडे होती ?
(६०) घराच्या मागच्या बाजूला उगवलेल्या वेलीसंबंधात सविस्तर वर्णन करा.

(६१) घराच्या सभोवताल पावसाळ्यात कोणकोणती फुले बहरत होती ?

(६२) बदलापूरच्या घरामध्ये पावसाळ्यात सर्वांना कशाची भीती वाटत असे ?

(६३) बदलापूरच्या घरामध्ये साजऱ्या होणाऱ्या सणांची माहिती द्या.

(६४) घरात सर्व सुखसमाधान होते असे म्हणताना लेखिकेने त्याचे वर्णन कसे केले आहे ?

(६५) बदलापूरचं घर अपुरंही पडू लागले असे का वाटू लागते ?

(६६) बदलापूरचे जुने घर पाडून नवीन इमारत बांधण्याच्या निर्णयानंतरच्या मनस्थितीचे थोडक्यात वर्णन करा.

(६७) बदलापूरच्या जुन्या घराच्या आठवणी कायम ठेवण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली ?

(६८) जमीनदोस्त झालेल्या बदलापूरच्या घराचे वर्णन लेखिकेने कसे केले आहे ?

(६९) सावित्रीबाई फुले यांना त्यांच्या पतींच्या आजारात कोणी कोणी व कशी मदत केली ?

(७०) सावित्रीबाई यांनी आपल्या पतीबरोबर स्त्रीशिक्षणासाठी केलेल्या कार्यांचे वर्णन करा ?

(७१) सावित्रीबाईंच्या ममतेचे लेखकाने वर्णन कसे केले आहे ?

(७२) लेखकाने सावित्रीबाईंच्या व्यक्तीरेखेचे वर्णन कसे केले आहे ?

(७३) सावित्रीबाईंची साधी राहणी लेखकाने या पाठात कशाप्रकारे मांडली आहे ?

(७४) सावित्रीबाईंचे पती जोतीरावांच्या निधनानंतरची परिस्थिती लेखकाने कशी मांडली आहे ?

(७५) सावित्रीबाईंनी जोतीरावांच्या पार्थिवाला अग्नी दिल्यानंतर आपल्या पतीची शेवटची इच्छा कशाप्रकारे पूर्ण केली ?

(७६) प्लेगच्या साथीत सावित्रीबाई फुले यांनी कोणतें कार्य केले .

(७७) "शब्दशस्त्र" या कवितेत कवीने शब्दाची ताकद कशी दाखवून दिली आहे ?

(७८) "शब्दाला" कवीने शस्त्रे-अस्त्र असे का म्हटले आहे ?

(७९) शब्दांना कशाचे पाते फुटावे असे कवयित्रीला वाटते ?

(८०) सूर्योदय कोणाकडे सोपवित आहे ?

(८१) उगवू दे तळहातांवर शस्त्रसूर्याचे नाते असे कवी का म्हणत आहे ?

(८२) "शब्दशस्त्र" या कवितेत कवी शेवटी आपल्या सहकाऱ्यांना कोणती गोष्ट देऊन जात आहे ?

(८३) चैत्रातल्या हळदीकुंकवाची तयारी कशी सुरू होई ?

(८४) महिलांच्या हळदीकुंकवाची तयारी कशी असे ?

(८५) आईने गाव हळदीकुंकू का केले ?

(८७) रखमाला कशामुळे व का उसंत मिळत नसे ?

(८८) हळदीकुंकवाचे आमंत्रण सुरू व्हायच्या आधीच गल्लीतील बायका काय करत ?

(८९) नाईकांचे हळदीकुंकू गावात प्रसिध्द का होते ?

प्र.२ खालीलपैकी कोणत्याही **दहा** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा :- **२०**

(१) "नटसम्राट" नाटकातील अभिनयसम्राटाचे नाव काय ?

(२) अमीरच्या हातात नेहमी कोणत्या रंगाची फाईलअसायची ?

(३) अमीरच्या वडिलांनी कसला कारखाना सुरू केला होता ?

(४) विडीच्या धंदयाबरोबर त्याचे वडील आणखी कोणता धंदा करीत ?

(५) ग्यानबाने किती रुपयांचे कर्ज घेतले होते ?
(६) ग्यानबाने किती एकर जमीन गहाण टाकली होती ?
(७) अमीर किती वर्षाचा होता ?
(८) अमीरने कोर्टाचा आदेश व डिक्रीचे काय केले ?
(९) अमीरने भीती प्रत्यक्ष डोळ्यांनी कधी पाहिली ?
(१०) ग्यानबाचे वय किती वर्षाचे होते ?
(११) डिक्री बजावण्यासाठी ग्यानबाकडे कोणकोण गेले ?
(१२) अमीरच्या वडिलांच्या कपाटात किती प्रकारच्या मिळकती पडून होत्या ?
(१३) बदलापूरचे घर किती वर्षापूर्वी बांधले होते ?
१४) बदलापूरचे नवीन घर बांधले तेव्हा आजूबाजूची परिस्थिती कशी होती ?
(१५) पाणी कोठून आणावे लागत होते ?
(१६) बदलापूरच्या घराभोवती लेखिकेने कोणती झाडे लावली होती ?
(१७) घराच्या मागच्या बाजूला कोणती वेल उगवली होती ?
(१८) आवारात आलेली शेवग्याची झाडे किती होती ?
(१९) घराच्या सभोवती पावसाळ्यात कोणती फुले येत होती ?
(२०) छोटासा व्हरांडा व चौकोनी ओटा कोठे होता ?
(२१) चौकोनी ओटयाच्या दोन्ही बाजूंना किती पायऱ्या होत्या ?
(२२) भाऊ भलं मोठ्ठं प्लॅस्टिक कोठून घेऊन यायचा ?
(२३) बदलापूरच्या घराने पाहिलेले व साजरे केलेले सण कोणते ?
(२४) बदलापूरच्या घरात समाधान, सुख यासह आणखी कोणत्या गोष्टी होत्या ?
(२५) बदलापूरचे घर अपुरे का पडू लागले ?
(२६) बदलापूरचे कौलारू घर पाडून त्या जागी कोणती वास्तू बांधण्याचे ठरले ?
(२७) बदलापूरच्या जुन्या घराच्या आठवणीसाठी कोणती युक्ती योजण्यात आली ?
(२८) घर पाडल्यानंतर कोणती झाडे पाडण्यात आली ?
(२९) जोतीरावांना कोणत्या साली पक्षाघाताचा आजार झाला ?
(३०) जोतीराव व सावित्रीबाई कशामुळे बेजार झाले होते ?
(३१) कोणत्या दिवशी जोतीरावांचे आजारपणात निधन झाले ?
(३२) सावित्रीबाईंची राहणी कशी होती ?
(३३) सावित्रीबाई दिसण्यास कशा होत्या ?
(३४) सावित्रीबाईंचा पोशाख कसा होता ?
(३५) सावित्रीबाईंनी स्वतः जोतीरावांचे अग्निसंस्कार का केले ?
(३६) सावित्रीबाईंनी तुळशी वृंदावन का उभारले ?
(३७) सावित्रीबाईंनी प्लेग रूग्णांची सेवा कशी केली ?
(३८) सावित्रीबाई फुले यांनी कोणत्या परिषदेचे अध्यक्षस्थान भूषविले ?
(३९) राजू आईबरोबर का जात असे ?
(४०) मोठं हळदीकुंकू करण्यासाठी आईने कोणते जिन्नस दादांजवळ दिले ?
(४१) नाईकबाई येताच आईवर कोणता परिणाम झाला ?

(४२) चैत्र ही कोणाची कथा आहे ?
(४३) चैत्र आला की कोणाचे धाबे दणाणे ?
(४४) हळदीकुंकू कोणत्या महिन्यात सुरू होते ?
(४५) गल्लीतील बायका कोवळ्या उन्हात काय टाकत ?
(४६) राजूला महिनाभर काय खायचा कंटाळा येतअसे ?
(४७) "चैत्र" या कथेत कथेचे कोणकोणते घटक आहेत ?
(४८) जी.ए.कुलकर्णी यांच्या चैत्र कथेतून काय प्रकट होते ?

**प्र.३** खालीलपैकी कोणत्याही दहा रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :- **१०**

(१) शब्द त्याच्या __________कधीच येऊ शकले नाहीत.

(२) फायलित व्यवस्थितपणे लावलेली --------- .

(३) अमीरचे कुटुंब काठेवाडी _________समाजाचे होते.

(४) अनेक नोकर चाकर, घरी दोन घोडयांची --------- .

(५) नगरपालिका अस्तित्वासआल्यानंतर सरपंचाचे गाव नगरपालिकेच्या __________आले.

(६) न्यायालयीन ________पाळून मी त्याला मदत करू शकत नव्हतो.

(७) अखेर त्याने _______ जिंकला

(८) ग्यानबर भीतीने _____ कापू लागला.

(९) तो माझ्यासमोर__________रडत होता.

(१०) मला त्या शेताचा ________ मिळणार होता.

(११) पाटिलकी राहिली नाही तरी देखील ग्यानबा पाटलाचा ___________ मात्र गेला नाही.

(१२) ग्यानबा अमीरच्या वडिलांच्या विडी कारखान्यात _________ काम करून पोट भरत होता.

(१३) बदलापूरला गावाबाहेर टेकडीवर एक __________ घर बांधलं.

१४) वडिलांनी नंतर ___________ साठवून ठेवलेल्या पैशांत हे घर बांधलं.

(१५) मोजून दोन _______ आणि समोर एक ________होती.

(१६) पावसाळ्यात छपराला _______ लावून आम्ही पाणी साठवायचो.

(१७) त्याचा इतका घमघमाट सुटला! तें फळ होत --------- .

(१८) आवारात अशीच आपोआप आलेली दोन ती __________झाड होती.

(१९) चिकूच्या झाडाला मात्र कधीच _________ चिकू आले नाहीत.

(२०) आई मला रागावून म्हणायची, ____________ आणून टाकलंय तुमच्या वडिलांनी !

(२१) बैठकीच्या खोलीबाहेर छोटासा ________ होता आणि त्याबाहेर एक _______ओटा होता.

(२२) मग भाऊ भलं मोठ्ठं _______ दादरहून घेऊन यायचा.

(२३) तस पाहिल तर त्या घरात आम्ही संगळे ________________ राहिलो.

(२४) माणसं जशी म्हातारी होऊ लागतात तशा ___________ म्हाताऱ्या होऊ लागतात.

(२५) जा्गा बिल्डरला देऊन _______________ बांधण्याच ठरवून टाकलं.

(२६) जुन्या घराची _________ जणू त्याला सहन होत नव्हती

(२७) पण या घराच्या खूप खूप कडूगोड आठवणी _________ निघून गेल्यासारख्या वाटत होत्या.

(२८) जोतीरावांना जुलै १८८७ मध्ये ____________ आजार झाला.

(२९) एक वेळ तर अशी आली की____________ पैसे नव्हते.

(३०) डॉ. _________ रामजी घोले यांनी मोफत उपचार केले.

(३१) जोतीरावांपेक्षा त्यांच्या पत्नीचे _________ करावे तेवढे थोडेच होईल.

(३२) ह्या उभयंतांनी __________ आपले जीवन खर्च केले.

(३३) दरम्यान २८ नोव्हेंबर __________रोजी जोतीरावांचे आजारपणातच निधन झाले.

(३४) ______________ या मुंबईच्या विद्यार्थ्याने या वसतिगृहात राहून सावित्रीबाईंच्या मायेची पाखर अनुभवली होती.

(३५) गरीब बायांची अंगावरची फाटलेली लुगडी पाहून त्यांना त्या आपल्या _______ लुगडी देत.

(३६) राग म्हणून काय चीज आहे ती या _________ गावीच नव्हती.

(३७) सावित्रीबाईंना सर्व लोक _________ म्हणत असत.

(३८) सावित्रीबाई तात्यांना _________म्हणत.

(३९) काकूंना दिवाणखान्यात थोडाही ______ अथवा ________पडलेली खपत नसे.

(४०) त्या जागेवर ____________ तुळशी वृंदावन उभारले.

(४१) जोतीरावांच्या पश्चात सावित्रीबाईंनी ___________ चळवळीचे नेतृत्व केले.

(४२) ___________ परिषदेचे अध्यक्षस्थान सावित्रीबाईंनी भूषविले होते.

(४३) १८९७ साल उजाडले तेच ______ थैमान घेऊन.

(४४) ____________ माळरानांवर त्यांनी यशवंतला दवाखाना घालायला लावला.

(४५) सावित्रीबाईंचे दिनांक _______ १८९७ रोजी रात्री ९ वाजता प्लेगमुळे निधन झाले.

**प्र.४** पुढीलपैकी कोणत्याही **पाच** वाक्प्रचारांचा अर्थ सांगून त्यांचा वाक्यात उपयोग करा. **१०**

१. श्रीमुखात भडकावणे
२. चामडी लोळवणे
३. इंगा दाखवणे
४. झाडा घेणे
५. कांगावा करणे
६. धक्कम लाडू
७. तोंडचे पाणी पळणे
८. पांगापांग होणे
९. कांडी फिरवणे
१०. धैर्य गळण
११. धावा करणे
१२. उसंत न मिळणे
१३. पायांचा कापूस होणे
१४. धाबे दणाणणे
१५. तारांबळ उडणे
१६. भरपाई करणे
१७. खपवून टाकणे
१८. शिरकाव होणे
१९. भान हरपून जाणे / भान हरपणे
२०. उल्हसित होणे
२१. मोहवून टाकणे
२२. चुटकीसरशी सोडवणे
२३. रीघ लागणे
२४. अद्दल घडवणे
२५. भीतीने लटलट कापणे
२६. घाम फुटणे
२७. ढसाढसा रडणे
२८. विनासायास मिळणे
२९. पाय जमिनीला टेकणे
३०. डोळे उघडणे
३१. रंध्रारंध्रात व्यापून राहणे
३२. नशीब उजाडणे
३३. धीर येणे
३४. नजर चुकवणे
३५. ओतप्रोत भरणे
३६. अंग चोरणे
३७. एखादया गोष्टीत जीव गुंतणे
३८. जमीनदोस्त होणे

३९. जतन करुन ठेवणे
४०. सिंहाच्या गुहेत शिरुन त्याची आयाळ पकडणे
४१. गावीच नसणे
४२. कळकळ असणे
४३. लागण होणे
४४. शोकाकुल होणे
४५. मन न निघणे
४६. जीवनाचा खेळ होणे
४७. दडी मारणे
४८. रक्तमांस आटविणे
४९. पान्हा फुटणे
५०. ध्यानीमनी असणे
५१. शेफारुन जाणे.
५२. नाक उडविणे
५३. मेतकूट जमणे
५४. हुरहुर लागणे
५५. ढिम्म न समजणे
५६. धूम ठोकणे
५७. छाती नसणे
५८. सुरसुरी येणे
५९. वरातीमागनं घोडं

**प्र.५** खालीलपैकी कोणत्याही **पाच** शब्दांचे अर्थ लिहा. **५**

१. घोकणे
२. कल्पित गोष्ट
३. वेडावणे
४. दम खा
५. माजघर
६. खानदेश
७. झाकाळून
८. नभ
९. मेघ
१०. दाटी
११. धमकणे
१२. तथास्तु
१३. अचपळ
१४. चांदवा
१५. अल्पमती
१६. घोळवणे

१७. गोटपाटल्या
१८. लुगडे
१९. प्रशस्त
२०. आरास
२१. पन्हे
२२. जाजम
२३. तळपट
२४. डागणी
२५. उत्क्रांती
२६. मोहल्ला
२७. बुजुर्ग
२८. निर्धास्त
२९. मौसम
३०. झिडकारणे
३१. दावा
३२. मुकादम
३३. शेतातील कोठा
३४. व्याजबट्टयाचा धंदा
३५. डिक्री
३६. बेलीफ
३७. प्रोत्साहन
३८. घोडयाची बग्गी
३९. कब्जा
४०. कोठा
४१. रोजगार
४२. मावळती
४३. घोटायला
४४. आड
४५. निभावणे
४६. ट्रंक
४७. भारी
४८. चाकरी
४९. मुलुख
५०. वास्तुशांत
५१. अप्रूप
५२. निर्धार
५३. डामडौल
५४. आभास
५५. अनंत
५६. साठीशांत
५७. चिबूड

५८. शुश्रूषा
५९. भरमसाठ
६०. योगदान
६१. लक्षणीय
६२. हालअपेष्टा
६३. नितांत
६४. निधन
६५. आप्तजन
६६. पूज्यभाव
६७. सदुपदेश
६८. बखळ
६९. टिटवे
७०. संसर्गजन्य
७१. पेरकुंडी
७२. कळसूत्री
७३. भावल्या
७४. करामती
७५. कमान
७६. मांजा
७७. चक्री
७८. औक्षण करणे
७९. महाराष्ट्रकन्या
८०. जिजा- लक्षुमी
८१. भवानी
८२. भवितव्य
८३. कळा
८४. दयाघन
८५. ऊर्मी
८६. आस
८७. रक्तमांस आटवणे
८८. वाण
८९. झब्बूदार
९०. टिपकागद
९१. अमोल
९२. ईशान्य
९३. वायव्य
९४. नैऋत्य
९५. आग्नेय
९६. पुस्ती
९७. मोडी
९८. परसू

.

**प्र.६** पुढीलपैकी कोणत्याही **पाच** रिकाम्या जागी योग्य ते नाम घाला :- **५**

(१) प्रत्येकाजवळ पुस्तके व ______ पडल्या आहेत.

(२) आईने मला ______ दिला नाही.

(३) ______ अंमळनेर, एरंडोल, पाचोरे - चार तालुके आहेत या खानदेशात!

(४) गडबडीत ________ मोडून दोन तुकडे झाले तिचे.

(५) अबब! केवढा लांबलचक ______ हा!

(६) आता ______तरी दे! म्हणजे वर्कबुकावरची ________ तरी खरडून टाकतो.

(७) ऋषीचे कूळ आणि नदीचे _____ तसेच भाषेचेही मूळ कोणी पाहू नये.

(८) जवळचे माणूस ओळखू येईना इतका _______ पडला.

(९) चहूकडे अंधाराचा ________ पसरला.

(१०) ओढे फुगले. नदया भरल्या. ________ फुटली.

(११) एका डोळ्यात _______ एका डोळ्यात चंद्र.

(१२) भुवयांच्या ठिकाणी __________ लपले.

(१३) ______ लहान पण कीर्ती मोठी.

१४) कृष्णा-गोदा यांचा ________ विणून पाळण्याला हलविण्यासाठी ________ केली.

(१५) पण नंतर मात्र महिनाभर हरभऱ्याचीच ______ खायचा त्याला कंटाळा येत असे.

(१६) _________ किसून केलेली ________ खाऊन त्याचे दात आंबायला आले होते.

(१७) त्या प्रशस्त वाडयाच्या मधल्या दिवाणखान्यात _________ होत असे.

(१८) तेथे लहान पोरांना देखील ______ प्यायला मिळे.

(१९) तिच्या अंबाडयात तळहाताएवढे सोन्याचे ________ होते.

(२०) दादानी सारे ________ गोळा केले व खिशात घातले.

(२१) आतापर्यंत मी नसती _______ कधी केली आहे काय ?

(२२) तिने यादीचा एक लांब ______ दादांना दिला.

(२३) तिची ______लहान धुतल्या बारीक तांदळासारख्या मोत्यांची होती.

(२४) आईचे _____ स्वच्छ आरशासारखे झाले आणि तिचा ________चिंचपाण्याने असलेल्या गौरीसारखा उजळला.

(२५) मनात काही _____ ठेवू नका.

(२६) मी काय, आज आहे उद्या नाही. पण अजून त्याच्यापुढें सारं ______ आहे.

(२७) नाईकांचे _______ गावात फार प्रसिध्द होते.

(२८) कोटयावधी वर्षांपूर्वी _____ सूर्यापासून अलग झाली.

(२९) _____ हा झाडासारखा आहे.

(३०) आसपासच्या वातावणामुळे माणसाचा ________ बदलतो.

(३१) ________ हा पुरातन वृक्ष तर आपल्या पूर्वजांसारखाच आहे.

(३२) ते जांभळाचं _________म्हणजे आमचा लहानपणीचा "गारवा"!

(३३) बांबुच्या वनातला वारा "सायं सायं" असा _______ घालत येतो.

(३४) ____________ पांढरट-पिवळी _______ हीसुध्दा कर्णफुलांसारखीच दिसतात.

(३५) झाड मोठं होताना त्याची _________मुलासारखी विशेष काळजी घ्यावी लागते.

(३६) चाफ्याचं झाड मोठं झाल की त्याची कुठलीही फांदी किंवा पान जरी तोडलं तरी तिथून दुधासारखा दिसणारा पांढरा ________निघतो.

(३७) पानं गळतात, पण आपला हिरवा रंग टाकून लाल, पिवळ्या, केशरी रंगाची अशी काही _________करतात की बघताना भान हरपून जातं.

(३८) मी _________ वरून बघतो, चंद्रही पिवळसर केशरी झालेला!

(३९) झाडांवर, निसर्गावर मी खूप _______ लिहिल्या.

(४०) अमीरचे ________ म्हणजे काठेवाडी खोजा समाजाचे होते.

(४१) अनेक नोकर _______ घरी दोन घोडयांची बग्गी.

(४२) न्यायालयीन ________ पाळून मी त्याला मदत करू शकत नव्हतो.

**प्र.७** पुढीलपैकी कोणत्याही **पाच** अधोरेखित शब्दांचे लिंग ओळखा :- **५**

१. दूरदर्शनवर संध्याकाळी सात वाजता बातमीपत्र असते.

२. प्रत्येक मराठी माणसाला तुकारामाचा अभंग माहित असतो.

३. संक्रांतीच्या दिवशी सर्व लोक एकमेकांना तीळगूळ घेतात.

४. दिवाळीत दारासमोर पणती लावतात.

५. नदीमधून एक बोट जाताना दिसत आहे.

६. ते घर नवीन बांधलेले आहे.

७. मुलगी छान नृत्य करते.

८. यंदाच्या वर्षी धरणामध्ये पाणी कमी आहे.

९. खेडेगावातील माणसे नदीवर जाऊन स्नान करतात.

१०. गाडगेबाबा गावोगावी जाऊन कीर्तन करीत.

११. ती गायिका खूप छान गाणे म्हणते.

१२. आज मंडईमध्ये ताजी भाजी आहे.

१३. मराठी चित्रपट मला फारसा आवडत नाही.

१४. दिवाळी हा सण मला फार आवडतो.

१५. परवा खूप पाऊस पडला.

१६. यावर्षी सवाई गंधर्व महोत्सव पुण्यात आहे.

१७. मराठी खूप सोपी भाषा आहे.

१८. राजपुत्राने ढोलीत असलेला साप मारला.

१९. संगणक खेडेगावात जाऊन पोहोचला आहे.

२०. भाऊंना भेटायला एक कार्यकर्ता आला.

२१. उद्या एक महत्त्वाची सभा घ्यायची आहे.

२२. फुलं सुंदर दिसतात.

२३. पुढील वर्षी निवडणूक होणार आहे.

२४. उसापासून साखर तयार होते.

२५. विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यास केला पाहिजे.

२६. मला वाचनालय खूप आवडते.

२७. राजाची मिरवणूक निघाली होती.

२८. महाराष्ट्रात सह्याद्री पर्वत आहे.

२९. त्याचे वडील न्यायाधीश आहेत.

३०. काळे मांजर मला आवडत नाही.

३१. मी काल लवकर झोपलो.

३२. त्याला भाज्या आवडत नाही.

३३. काल जोरात पाऊस आला.

३४. ते पुस्तक मला दे.

३५. परीक्षा कशी होती ?

३६. संत तुकाराम महाराजांचे अभंग मी नेहमी वाचतो/ते.

३७. मधमाशी गोड मध निपटून घेते.

३८. पावसाचे थेंब चित्रावर पडत होते.

३९. मीना नाटक बघत असेल.

४०. तलावातील पाणी सूर्यप्रकाशात चमकत होते.

४१. कादंबरीत नरहरी नावाचे पात्र होते.

४२. नाटकातील कलाकारांनी प्रेक्षकांना अभिवादन केले.

४३. माणूस विचार करणारा प्राणी आहे.

४४. उनपावसाचा खेळ छान रंगला होता.

४५. विठ्ठलाचे मंदिर चंद्रभागेकाठी आहे.

४६. कुसुमाग्रजांची कविता मला फार आवडते.

४७. माणसाने विचार करून मगच बोलावे.

४८. ही पाऊलवाट कुठे जाते ?

४९. यामागे काहीतरी प्रयोजन नक्कीच आहे.

५०. फुलपाखरू छान किती दिसते !

प्र.८ **पुढीलपैकी कोणत्याही पाच नामांची वचने बदला** **गुण ५**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पाठ | ४१. | कावळे | ८१. | नदी | १२१. | नाटक |
| २. | निर्णय | ४२. | दागिना | ८२. | पेटी | १२२. | मंडळ |
| ३. | हात | ४३. | पाहुणा | ८३. | राणी | १२३. | मैदान |
| ४. | पाय | ४४. | अट | ८४. | काकडी | १२४. | भांडार |
| ५. | आदेश | ४५. | आग | ८५. | खूर्ची | १२५. | सरकार |
| ६. | कान | ४६. | तक्रार | ८६. | बाई | १२६. | देवालय |
| ७. | नियम | ४७. | सोय | ८७. | बादली | १२७. | कार्यालय |
| ८. | केस | ४८. | जाहिरात | ८८. | भाजी | १२८. | फूल |
| ९. | कप | ४९. | सहल | ८९. | सुई | १२९. | मूल |
| १०. | नारळ | ५०. | आठवण | ९०. | आकृती | १३०. | कूळ |
| ११. | झाप | ५१. | मोटार | ९१. | आवृत्ती | १३१. | बीळ |
| १२. | महिना | ५२. | समजूत | ९२. | युक्ती | १३२. | दूध |
| १३. | फळा | ५३. | भिंत | ९३. | युवती | १३३. | लोणी |
| १४. | मसुदा | ५४. | विहीर | ९४. | दासी | १३४. | पाणी |
| १५. | रस्ता | ५५. | बहीण | ९५. | कृती | १३५. | मोती |
| १६. | राजा | ५६. | तारीख | ९६. | वस्तू | १३६. | पाखरु |
| १७. | मुलगा | ५७. | खारीक | ९७. | बाजू | १३७. | लिंबू |
| १८. | आंबा | ५८. | बेरीज | ९८. | वधू | १३८. | वासरू |
| १९. | बटाटा | ५९. | गरज | ९९. | बायको | १३९. | गाणे |
| २०. | हप्ता | ६०. | जखम | १००. | नवरा | १४०. | तळे |
| २१. | डोळा | ६१. | शपथ | १०१. | म्हैस | १४१. | मडके |
| २२. | कवी | ६२. | काच | १०२. | कोळीण | १४२. | केळे |
| २३. | भिकारी | ६३. | वाट | १०३. | बेरीज | १४३. | भांडे |
| २४. | पक्षी | ६४. | चिंच | १०४. | वाट | १४४. | डोके |
| २५. | प्रवासी | ६५. | चूक | १०५. | स्त्री | १४५. | घरटे |
| २६. | गवळी | ६६. | वीज | १०६. | पोपई | १४६. | देणे |
| २७. | हत्ती | ६७. | भूक | १०७. | सासू | १४७. | घेणे |
| २८. | धोबी | ६८. | बंदूक | १०८. | ऊ | १४८. | खेडे |
| २९. | कोळी | ६९. | सून | १०९. | पत्र | १४९. | दंगा |
| ३०. | पुढारी | ७०. | करमणूक | ११०. | घर | १५०. | उदाहरण |
| ३१. | मुनी | ७१. | शाळा | १११. | मन | १५१. | सफरचंद |
| ३२. | चेंडू | ७२. | शाखा | ११२ | चित्र | १५२. | सोने |
| ३३. | भाऊ | ७३. | विद्या | ११३. | झाड | १५३. | धनको |
| ३४. | खाऊ | ७४. | शिक्षा | ११४. | काम | | |
| ३५. | लाडू | ७५. | भाषा | ११५. | दार | | |
| ३६. | हेतू | ७६. | कविता | ११६. | फळ | | |
| ३७. | पेरु | ७७. | सूचना | ११७. | वाक्य | | |
| ३८. | गहू | ७८. | धारणा | ११८. | वेतन | | |
| ३९. | मृत्यू | ७९. | महिला | ११९. | पुस्तक | | |
| ४०. | काजू | ८०. | जनगणना | १२०. | कपाट | | |

**प्र.९** पुढीलपैकी कोणत्याही पाच शब्दांपासून नामे बनवा ५

| | | | |
|---|---|---|---|
| १. | नम्रता | १६. | हुषारी |
| २. | प्रामाणिकता | १७. | सुंदर |
| ३. | सौंदर्य | १८. | झोपणे |
| ४. | क्रौर्य, क्रूरता | १९. | दाखविणे |
| ५. | मित्रत्व | २०. | चौकशी करणे |
| ६. | कटुता | २१. | तपासणे |
| ७. | चांगुलपणा | २२. | पेरणे |
| ८. | मालकी | २३. | पिणे |
| ९. | गुलामगिरी | २४. | जाणे |
| १०. | सावधगिरी | २५. | खाणे |
| ११. | सुवासिक | २६. | वाचणे |
| १२. | मासिक | २७. | जेवणे |
| १३. | विवाहित | २८. | मरणे |
| १४. | वार्षिक | २९. | ठरविणे |
| १५. | आनंदी | ३०. | हसणे |

**प्र.१०** पुढीलपैकी कोणत्याही पाच शब्दांची संधी सोडवा ५

| | | | |
|---|---|---|---|
| १. | तथास्तु | १६. | वटहुकूम |
| २. | सदुपदेश | १७. | सूर्योदय |
| ३. | आप्तजा | १८. | बालिकाश्रम |
| ४. | घटानाक्रम | १९. | महोत्सव |
| ५. | दयाघन | २०. | ध्वनिशास्त्र |
| ६. | क्षितीन्द्र | २१. | भाषाभ्यास |
| ७. | ज्ञानांजन | २२. | भ्रष्टाचार |
| ८. | अनंत | २३. | गणेश |
| ९. | जमीनदोस्त | २४. | सूर्यास्त |
| १०. | भूकंप | २५. | कुसुमाग्रज |
| ११. | नभांग | २६. | वाचनालय |
| १२. | निरामय | २७. | दिवसरात्र |
| १३. | देवालय | २८. | सदाचार |
| १४. | महाराणी | २९. | गुरुपदेश |
| १५. | सदिच्छा | ३०. | मतैक्य |

**प्र.११** कंसातील दिलेल्या सूचनांनुसार बदल करुन कोणतीही पाच वाक्ये पुन्हा लिहा ५

१. विवेकला चित्रपट बघायला आवडत नाही. (अर्थ न बदलता होकारार्थी वाक्य लिहा)

२. केशव आताच शाळेत गेला. (प्रश्नार्थक वाक्य तयार करा)

३. त्यांनी विचारले तुकोबा आपण इथं केव्हा आलात (योग्य विरामचिहे वापरून वाक्य पुन्हा लिहा.)

४. भारत हा कुषीप्रधान देश आहे. (वाक्य शुध्द करून लिहा.)

५. तृप्त घरोघरी विठू रखुमाई. (अधोरेखित शब्दांच्या जाती ओळखा)

६. तो माणूस चांगला शिकलेला आहे. (अधोरेखित शब्दांसाठी एक शब्द वापरा)

७. ती मुलगी उंच आहे. (नकारार्थी करा)

८. त्यांनी आंबे खाल्ले. (भविष्यकाळ करा)

९. तो त्याचं पुस्तक वाचतो ('तो' ऐवजी 'ती' वापरा)

१०. परिक्शा कठिन नवती. (वाक्य शुध्द करूा लिहा)

११. कार्यालयीन पत्रव्यवहार मराठीत (होणे) पाहिजे. (कंसातील क्रियापदाचे योग्य रूप वापरा)

१२. (त्यांचे मोठे मामा) आम्हांला गोष्ट सांगितली. (कंसातील शब्दांचे योग्य रूप वापरा)

१३. चंद्रलेखा गाणे गाते. (प्रयोग ओळखा)

१४. आमचे भविष्य उज्ज्वल नाही असे नव्हे. (अर्थ न बदलता होकारार्थी वाक्य करा)

१५. जिजाबाईनी हाती तलवार घेतली. (प्रयोग ओळखा)

१६. राणीलक्ष्मीबाईने स्वतंत्र-संगरामात उडी घेतली. (वाक्य शुध्द लिहा)

१७. लोकांनी न्यायहक्कांची मागणी करावी. (वाक्य आज्ञार्थी करा)

१८. (अहिंसा) (पुजारी) सत्याग्रहाचा मार्ग सापडला (कंसातील शब्दांची योग्य रूपे वापरा)

१९. शिवारातून एक इसम धावत येत होता. (वाक्यातील कर्ता ओळखा)

२०. फुकाफुकी जळून भस्मसात होण्यात अर्थ नाही. (प्रश्नार्थक वाक्य करा)

२१. तो मुलगा <u>उंचीने लहान</u> आहे. (अधोरेखित शब्दासाठी एक शब्द वापरा)

२२. शिक्षकांनी त्याला क्षमा (करणे). (कंसातील क्रियापदाचे योग्य रूप वापरा).

२३. ते फूल सुंदर आहे. (नकारार्थी करा)

२४. पक्षी आकाशात उडत आहेत. (भविष्यकाळ करा)

२५. पृथ्वी सूर्याभोवती फिरते. (वाक्य शुध्द करून लिहा)

२६. रामाने रावणास मारले. (प्रयोग ओळखा)

२७. येथे परीक्षा चालू आहे. (प्रश्नार्थक करा)

२८. ती सुसाट वेगाने गेली. ('ती' ऐवजी 'तो' वापरा).

२९. महाराष्ट्रात (येणे) आधी मी वाराणसीला होतो/ते. (कंसातील क्रियापदाचे योग्य रुप वापरा).

३०. तो <u>केलेले उपकार जाणणारा</u> आहे. (अधोरेखित शब्दांसाठी एक शब्द वापरा).

३१. भिमाने तलवार हाती घेतली. (प्रयोग ओळखा)

३२. तो शब्द  निदान शब्दकोशात निश्चित असेल. (प्रश्नार्थक करा)

३३. प्रयत्न करा म्हणजे यश मिळेल. (काळ ओळखा)

३४. हा मोठा बंगला कुणाचा ('हा' ऐवजी 'हे' वापरा)

३५. आपले खेळाडू चांगले खेळतात. (नकारार्थी करा)

३६. परिक्षेला (निघणे) पूर्वी सर्व लेखासाहित्य बरोबर घेतले पाहिजे. (कंसातील क्रियापदाचे योग्य रूप लिहा.)

३७. त्याला खेडेगावात राहणे आवडत नाही. (अर्थ न बदलता होकारार्थी वाक्य करा)

३८. ति स्त्रि डाक्तरीन आहे. (शुध्द करून लिहा)

३९. लेखक दिवाळी अंकात वास्तुशास्त्रावर लेख लिहिणार आहे. (प्रश्नार्थक वाक्य बनवा)

४०. (शहर) (लोक) (वीज टंचाई) मोठ्या समस्येला तोंड द्यावे लागणार आहे. (कंसातील शब्दांची योग्य रूपे वापरा)

४१. मी बाजारात जाणार आहे.  ('मी' ऐवजी 'आम्ही' वापरून वाक्य लिहा)

४२. यंदा पाऊस वेळेवर (येणे) पाहिजे. (कंसातील क्रियापदाचे योग्य रूप वापरा)

४३. त्याला अभ्यास आवडत नाही. (होकारार्थी वाक्य बनवा)

४४. प्रत्येक (माणूस) ला (व्यायाम) चे महत्व (कळणे) पाहिजे. (कंसातील शब्दांची योग्य रूपे वापरा)

४५. तो मनुक्ष यंतरविद्या जाणणारा आहे. (शुध्द करून लिहा)

४६. कारले खूप कडू चवीचे आहे. (शुध्द करून लिहा)

४७. <u>सिनेमा</u> रंगीत आहे. (अधोरेखित शब्दासाठी समानार्थी शब्द वापरा)

४८. <u>विविध रूपे घेणारा नट</u> सगळयांनाच खूप आवडतो. (अधोरेखित शब्दासाठी एकच शब्द वापरून वाक्य पुहा लिहा)

४९. परीक्षेचा निकाल वेळेवर (लागणे) पाहिजे. (कंसातील क्रियापदाचे योग्य रूप वापरा)

५०. शासन व्यवहारात राजभाषा मराठीचा वापर (करणे) पाहिजे (कंसातील क्रियापदाचे योग्य रुप वापरा)